पालघर, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर या जिल्हयातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणातील रिक्त पदांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम - जून-२०२२

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्र.रानिआ/जिपपस/२०२२/प्र.क्र. ०७/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ११ मे,२०२२.

प्रति,
जिल्हाधिकारी,
पालघर, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर

विषय :- पालघर, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर या जिल्हयातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणातील रिक्त पदांच्या पोट निवडणुकीचा कार्यक्रम - जून-२०२२

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाची पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.०७/का.७, दिनांक २२/०४/२०२२.

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त संदर्भांकित दि.२२/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील पालघर, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर या जिल्हा परिषदांमधील निवडणूक विभांग व त्याअंतर्गत पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणातील रिक्त पदांच्या पोट निवडणुकरिता मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम देण्यात आला असून दि.११/०५/२०२२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

२. आता या पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट -२ व ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

३. सदर निवडणूक विभाग/निर्वाचक गणाच्या पोट निवडणुकीची आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. सदर आचारसंहिता पोट निवडणूक होणाऱ्या संबंधित निवडणूक विभाग/निर्वाचक गणाच्या क्षेत्रात लागू राहील. मात्र पोटनिवडणूक असलेल्या निवडणूक विभाग/निर्वाचक गणातील मतदारांवर प्रभाव पडेल, अशा तऱ्हेचे कोणतेही

धोरणात्मक निर्णय, कोणतीही कृती/घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था, खासदार, आमदार किंवा इतर कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

४. उपरोक्त रिक्त पदांच्या पोट निवडणूकीसंदर्भात कोणत्याही न्यायालयात याचिका दाखल असल्यास त्याबाबत खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच मा. न्यायालयाचे कोणत्याही रिट याचिकामध्ये स्थगिती आदेश असल्यास/प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम स्थगित करण्यात यावा व तसे आयोगास अवगत करावे.

५. माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्यावेळी निवडणुकीच्या पुर्वतयारीबाबत राज्य निवडणूक आयोगाने संदर्भांकित दि. २ जानेवारी, २०१७ च्या पत्रान्वये सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. (प्रत संलग्न) या सूचनांनुसार उपरोक्त रिक्त पदाच्या पोटनिवडणुकीच्यावेळी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

६. केंद्र व राज्य शासनाकडून कोविड-१९ च्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना व दक्षता घेण्याबाबतच्या सूचना / निर्बंध लागू झाल्यास आयोगाचे दि.१७/०१/२०२२ च्या आदेशातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

७. जिल्हा परिषदेमधील निवडणूक विभाग व पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणाच्या रिक्त पदाच्या पोट निवडणूकीचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र-परिशिष्ट-१ ते ३

प्रत :-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग

४. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, मंत्रालय, मुंबई-१
५. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. विभागीय आयुक्त, कोकण, नाशिक, अमरावती व नागपूर
७. जिल्हा पोलिस अधिक्षक, पालघर, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर
८. संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई-४
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर
१०. महिती जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
११. राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनवरील सर्व वकील
१२. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१४. निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-
रानिआ/जिपपंस/२०२२/प्र.क्र.०७/का.७,
दिनांक ११/०५/२०२२ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट-१

## पालघर, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर या जिल्हयातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणातील रिक्त पदांच्या पोट निवडणुकीचा कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पे | कार्यक्रमांचा दिनांक |
|---|---|---|
| १ | निवडणुकीच्या तारखांची सूचना व निवडणुकीचा कार्यक्रम जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिध्द करण्याची तारीख | मंगळवार, १७ मे, २०२२ |
| २ | संकेतस्थळावर भरण्यात आलेले नामनिर्देशनपत्र निर्वाचन अधिकाऱ्यांनी स्विकारण्याचा कालावधी | मंगळवार, १७ मे, २०२२ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) ते सोमवार २३ मे, २०२२ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) (रविवार दि.२२/०५/२०२२रोजी सार्व.सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत.) |
| ३ | नामनिर्देशनपत्राची छाननी व त्यावर निर्णय देणे | मंगळवार, २४ मे, २०२२ (सकाळी ११ वाजल्यापासून) |
| ४ | वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार, २४ मे, २०२२ ( छाननीनंतर लगेचच ) |
| ५ | नामनिर्देशनपत्राचा स्विकार करण्याबाबत किंवा ते नामंजूर करण्याबाबतचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुध्द जिल्हा न्यायाधिशांकडे अपिल करण्याची शेवटची तारीख | शुक्रवार २७ मे,२०२२ |
| ६ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिलावर सुनावणी व निकाल देण्याची संभाव्य शेवटची तारीख | सोमवार, ३० मे, २०२२ |
| ७ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिल निकालात काढल्यावर वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | सोमवार, ३० मे, २०२२ |
| ८ | उमेदवारी मागे घेणे (अ) जेथे अपील नाही तेथे | सोमवार, ३० मे, २०२२ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |
| | (ब) जेथे अपील आहे तेथे | बुधवार, ०१ जून, २०२२ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |

| | | |
|---|---|---|
| ९ | निवडणूका लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप-<br>(अ जेथे अपील नाही तेथे | सोमवार, ३० मे, २०२२<br>(दुपारी ३.३० नंतर) |
| | (ब) जेथे अपिल आहे तेथे | बुधवार, ०१ जून, २०२२<br>( दुपारी ३.३० नंतर) |
| १० | मतदानाची तारीख | रविवार, ०५ जून,२०२२<br>(सकाळी ७.३० ते ५.३० पर्यंत) |
| ११ | मतमोजणी तारीख | सोमवार, ०६ जून,२०२२<br>(सकाळी १०.०० पासून) |
| १२ | निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे | शुक्रवार, १० जून,२०२२पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.०७/का.७, दि.११/०५/२०२२

## परिशिष्ट-२

| अ.क्र. | जिल्हा परिषद | तालुका | निवडणूक विभागाचा क्र व नाव |
|---|---|---|---|
| १ | नंदुरबार | नवापूर | ५२-चितवी |
| २ | अकोला | बाळापूर | ३५-हातरुण |

## परिशिष्ट-३

| अ.क्र. | जिल्हा | पंचायत समितीचे नाव | निर्वाचक गणाचा क्र व नाव |
|---|---|---|---|
| १ | पालघर | मोखाडा | ५७ -पोशेरा |
| २ | धुळे | शिरपूर | २६-हिसाळे |
| ३ | धुळे | साक्री | ५२-हट्टी खु. |
| ४ | नंदुरबार | अक्राणी | २९-असली |
| ५ | वाशिम | मालेगाव | ५७-ब्राम्हणवाडा न- मारसुळ |
| ६ | नागपूर | सावनेर | ३४-चणकापूर |